**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
बारामती विभाग, बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पुणे श्री.अशोक मोराळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
बारामती विभाग, बारामती, जि.पुणे डॉ.श्रीकांत परोपकारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कंपनी व्यवस्थापकावर खोटी माहिती देणे या गुन्ह्याखाली कार्यवाही का होत नाही? बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.व्ही.व्ही.हरिहर यांनी मानवी हकक आयोगास खोटा, दिशाभूल करणारा अहवाल का पाठविला? दि.४ मार्च १९९७ ते दि.४.२.२००१ या काळात काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना काढावयाचे की नाही हा प्रश्न होता. याबाबत उपमुख्यमंत्र्यांचे व न्यायालयाचे आदेश असताना पोलीस निरीक्षक यांनी बळाचा वापर कसा केला? संघटनेच्या सभासदांच्या उपासमारीस जबाबदार पोलीस अधिकाऱ्यावर कार्यवाही करणार का? परप्रांतीय मॅनेजर श्री.ए.एस.बागी यांच्यावर कार्यवाही करणार का? सदर प्रश्नी इतर राजकीय व्यक्तीचा हस्तक्षेप होता का? असल्यास नावासह माहिती. | |

## विवेचन

दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

बारामती तालुका सुरक्षा रक्षक व कामगार संघटनेच्या ३३ सभासदांना पाच वर्षे काम केल्यानंतर काढून टाकण्यात आले. त्याविरुध्द न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल दिलेला असतानाही पोलिसांनी बळाचा वापर करुन सर्व सुरक्षा रक्षकांना हाकलून काढले. हा हस्तक्षेप बेकायदेशीर आहे. तो करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्यासाठी चुकीची माहिती दिली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे यांनी केली. पोलिस अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे आदेश न वाचताच कार्यवाही केली आहे. हे कृत्य बेकायदेशीर आहे. अन्याय

करणाऱ्यांवर कारवाई व्हावी व सुरक्षा रक्षकांना न्याय मिळावा, अशी मागणी श्री.बनसोडे यांनी केली.

श्री.बनसोडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गतचा अर्ज पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे केला होता. हा अर्ज आपल्याला प्राप्त झाल्यानंतर मुद्देनिहाय माहिती देण्यात आली. श्री.बनसोडे यांचा विषय माहितीपेक्षा प्रशासकीय कार्यवाहीचा आहे. तसेच पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द त्यांची तक्रार आहे. याबाबत ते वेगळी तक्रार करुन दाद मागू शकतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे श्री.अशोक मोराळे यांनी केली.

पोलिसांनी केलेला हस्तक्षेप कायदेशीर, की बेकायदेशीर, याचा निर्णय करणे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १३४९ / २००९ / सातारा | श्री. महेश पोपट कुंभार मु. पो. वरकुटे मलवडी, ता. माण, जि. सातारा | जनमाहिती अधिकारी, धातू व कागदबाजार दुकाने मंडळ, बृहन्मंबई महाराष्ट्र स्टेट सहकारी ग्राहक भवन, प्रि. शेख हसन मार्ग क्र. १ चिंचबंदर, मुंबई- ४००००१ | प्रथम अपिलीय प्राधिकारी, धातू व कागदबाजार दुकाने मंडळ, बृहन्मंबइ महाराष्ट्र स्टेट सहकारी ग्राहक भवन, प्रि. शेख हसन मार्ग क्र. १ चिंचबंदर, मुंबई-४००००१ | धातू व कागद बाजार दुकाने मंडळ, बृहन्मुंबई चे निरिक्षक श्री. दत्तात्रय ना.साळूंखे यांच्या कार्य- कालावधीत जे काही मालक नोंदीत झालेले आहेत त्यांची नावे, दूरध्वनी क्रमांक इ. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २. | ११६८ / २००९ / सातारा | श्री. सत्वशील धैर्यशील शेळके मु. पो. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा | जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | मौजे लोणंद, ता. खंडाळा येथील स. नं. २७९/२अ/१ ही जमीन भू. सं. अधिनियम १८९४ चे कलम ५२-क प्रमाणे सक्षम अधिकारी यांनी कब्जात घेतली आहे का? इत्यादींची खुलासेवजा माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच याच विषयाबाबत अपीलकर्त्यांने आयोगाकडे केलेल्या अपिलांवर पूर्वी आदेश झालेले आहेत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ व २ (अपील क्रमांक १३४९/२००९/सातारा व ११६८/२००९/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३०-०९-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सोपान जगन्नाथ भोंडवे
मु.पो.भोंडवेवाडी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत),
पुणे जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग,
पुणे जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सोपान जगन्नाथ भोंडवे
मु.पो.भोंडवेवाडी, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत),
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.एम.एस.घुले

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग,
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.एम.एम.वाघ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>दि.१६ ऑगस्ट २००६ चे तक्रार अर्जाची काय चौकशी केली व संबंधितांवर काय कारवाई केली? १५ ऑगस्ट २००६ चे स्वातंत्र्यदिनाचे कार्यक्रमात ध्वजारोहण व सभेचे अध्यक्षपदापासून सरपंचाना डावलल्याने मुख्याध्यापक व ग्रामसेवक यांची काय चौकशी केली व संबंधितांवर काय कारवाई केली? सन २००४ पासून आजपर्यंतचे स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनाचे कार्यक्रमात सरपंचाना डावलून इतर व्यक्तीकडून ध्वजारोहण करुन तशी नोंद शाळेच्या शेरेबुकात केलेली आहे. त्याची माहिती व संबंधितावर काय कारवाई केली. | |

## विवेचन

दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण केलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशीची व त्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती दिलेली नाही. सन २००४ पासून २००६ पर्यंत स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनांचे कार्यक्रम सरपंचांना डावलून होत असल्याबद्दलची तक्रार आपण केली होती. परंतु दोन वर्षे होऊनही त्याची चौकशीच केलेली नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हेच चौकशी अधिकारी असल्यामुळे माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता यांनी केले. श्री.भोंडवे यांची मागणी माहितीची नसून स्थानिक चौकशीच्या कार्यवाहीची आहे. अशा चौकशीस लागणाऱ्या विलंबामुळे माहिती देण्यास विलंब लागला. चौकशी पूर्ण झाल्यावर सरपंचांच्या जबाबाच्या प्रतीसह माहिती श्री.भोंडवे यांना देण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी

तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.एम.एस.घुले यांनी केले. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते योग्य आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. सतीश शांतीलाल चोपडा
६/६, सुपार्श्वनाथ हौसिंग सोसायटी, मार्केटयार्ड रोड, पुणे - ३७ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
विकास अभियंता (बांधकाम नियंत्रण), पुणे महानगरपालिका **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
नगर उपअभियंता (विकास योजना), पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६८+ १३६९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८/८/२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सतिश शांतीलाल चोपडा
६/६, सुपार्श्वनाथ हौसिंग सोसायटी, मार्केटयार्ड रोड, पुणे - ३७

**अपिलीय प्राधिकारी तथा** विकास अभियंता (बांधकाम नियंत्रण)
महानगरपालिका, पुणे - ५
श्री. मदन आढारी

**जन माहिती अधिकारी तथा** नगर उप अभियंता (विकास योजना)
पुणे महानगरपालिका, पुणे - ५
श्री. अनिरुध्द पावसकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. -- |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती** -मौजे सुतारवाडी (पाषाण) ता. हवेली येथील सर्व्हे नं १० चा झोन दाखला | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सतीश शांतीलाल चोपडा यांनी मौजे सुतारवाडी (पाषाण), ता. हवेली सि. सर्व्हे नं. १० चा झोन दाखला जन माहिती अधिकार नगर अभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका यांच्या कडे मागितला होता.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले. तथापी अपीलकर्त्यांने अपिलासोबत कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. या अपीलाची दि. २८/८/२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार झोन दाखले प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. अशा दाखल्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करण्यापेक्षा अपीलकर्त्याने प्रचलित नियमावलीनुसार त्यासाठी अर्ज करुन विहित शुल्क भरुन झोन दाखला प्राप्त करुन घेणे अधिक संयुक्तीक होईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्राणे :-

## आदेश

वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. काकोसा शंकर घाडगे
मु. पो. मलवडी, ता. माण, जि. सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय माण, जि. सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६८ / २००९ / सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.६.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.६.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.८.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - मौजे मलवडी येथील फेरफार नं. ३५८२ व २७८८ मिळावे. | |

(कृ. मा. प.)

# विवेचन

अपीलकर्ता, श्री. काकासो शंकर घाडगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच आवश्यक मुद्रांक शुल्क (रु. २०/-) जोडलेले नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि.३०-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.सुभाष एकनाथ साळुंखे,
५७ ब, श्री गुरुकृपा सहकारी सहभागीदारी गृहनिर्माण संस्था,
शाहुनगर, सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
माध्यमिक शिक्षण विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
श्रीपतराव पाटील हायस्कूल, करंजे पेठ, सातारा उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७+४७२+८४३/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष एकनाथ साळुंखे
५७ ब, श्री गुरुकृपा सहकारी सहभागीदारी गृहनिर्माण संस्था,
शाहुनगर, सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
माध्यमिक शिक्षण विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा श्री.उदयसिंह आनंदराव भोसले

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
श्रीपतराव पाटील हायस्कूल, करंजे पेठ, सातारा श्री.एस.एस.शेलार

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १३७ | दि.२३.६.२००६ | दि.३१.७.२००६ | दि.३.८.२००६ | |
| ४७२ | दि.१७.४.२००८ | दि.२३.४.२००८ | दि.२३.५.२००८ | दि.३.७.२००८ |
| ८४३ | दि.१३.४.२००९ | दि.१६.४.२००९ | दि.१३.५.२००९ | दि.-- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

**अपील क्र.१३७**-वरिष्ठ श्रेणी प्रस्तावासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती, भविष्य निर्वाह निधीच्या मूळ प्रती-१९८४ पासून मार्च २००६ पर्यंत, तसेच स्लिपा.
**अपील क्र.४७२**-सन २००७ - २००८ सालातील सेवाजेष्ठता यादी 'B' व 'D' ची प्रत्येकी एक मूळ प्रत अवलोकन करण्यास मिळावी. प्रत्यक्ष डी प्रतीवर १ ते १० नावे असलेली मूळ प्रत. बी प्रतीवर १ ते १९ नावे असलेली मूळ प्रत.
**अपील क्र.८४३**-श्रीपतराव पाटील हायस्कूल, करंजे पेठ, सातारा या शाळेतील सन१९९१-९२ व १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात डी.एड. वेतनश्रेणीमधून बी.एड.वेतनश्रेणी दिलेल्या शिक्षकांचे आपल्या कार्यालयात सदर शाळेने सादर केलेल्या मान्यता प्रस्तावातील सर्व कागदपत्रांच्या सही-शिक्का प्रती.

## विवेचन

आपल्याला दि.२१.८.१९९२ पासून दिलेली डी.एड. ते बी.एड. वेतनश्रेणी साडेचौदा वर्षांनी दि.३१.१.२००७ नंतर शिक्षण प्रसारक संस्था, साताराचे श्रीपतराव पाटील हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, करंजेपेठ, सातारा यांनी काढून घेतली व डी.एड. वेतनश्रेणीत आपल्याला समाविष्ट केले. आपल्याला दि.२१.८.१९९२ पासून सेवा सलगतेसह बी.एड. वेतनश्रेणी द्यावी, त्यानुसार सेवाज्येष्ठता यादीत आपला समावेश व्हावा व कालबध्द पदोन्नतीच्या सूत्रानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी मिळावी, या मागण्यांसाठी अपीलकर्ता श्री.सुभाष एकनाथ साळुंखे गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न करीत आहेत. या अनुषंगाने बी.एड.मान्यतेचे पत्र, भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या, सेवापुस्तक पूर्ण करुन देणे आदींची मागणी माहितीच्या अधिकारात त्यांनी विविध अर्जांद्वारे केली आहे. ही

माहिती आपल्याला मिळत नसल्याच्या कारणावरुन श्री.साळुंखे यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

आयोगाने दि.१५.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.१३७ चा समावेश होता. संबंधित कागदपत्रे १५ दिवसात प्राप्त करुन घेऊन देण्यात येतील, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ.एस.एस.माळी यांनी प्रपत्रात नमूद केले होते. संस्थेचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्यासमवेत वरिष्ठ लिपीक श्री.एस.बी.कुंभार उपस्थित होते. १५ दिवसांत ही माहिती दिली नाही, अपिलाची सुनावणी दि.१०.१२.२००८ रोजी आयोगापुढे झाली, त्यावेळी संबंधित कागदपत्रे न दिल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुभाष मारुती शेलार व वरिष्ठ लिपीक श्री.एस.बी.कुंभार यांना आयोगाने कडक समज दिली. कागदपत्रांची पूर्तता करण्यात येत असल्याचे व काही कागदपत्रे श्री.साळुंखे यांना शिक्षणाधिकारी कार्यालयातून व भविष्य निर्वाह निधी कार्यालयातून उपलब्ध करुन घेऊन देण्यात येत असल्याचे प्रतिपादन श्री.कुंभार यांनी केले. मात्र आपले सेवापुस्तक आपल्याला दिलेले नाही, तसेच मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सातारा जिल्हा परिषद, सातारा यांनी आदेश देऊनही देय वेतनश्रेणी देण्याबाबत कार्यवाही केलेली नाही व त्या संदर्भात कोणतीही माहिती आपल्याला दिली जात नाही, असे निवेदन श्री.साळुंखे यांनी केले.

शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर यांच्या निर्णयानुसार संस्थेने दि.२१.८.१९९२ पासून श्री.साळुंखे यांना दि.३१.१.२००७ पर्यंत डी.एड. ते बी.एड. वेतनश्रेणी दिली होती. शाळा न्यायाधिकरणाच्या निकालाविरुध्द संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात अपील केले. उच्च न्यायालयाने दि.१२.१.२००७ रोजी त्याचा निर्णय देऊन शाळा न्यायाधिकरणाचा निकाल रद्दबातल ठरविला. त्यामुळे संस्थेने श्री.साळुंखे यांची वेतनश्रेणी काढून घेतली. त्याविरुध्द श्री.साळुंखे यांनी उच्च न्यायालयात केलेल्या रिट याचिकेचा निकाल उच्च न्यायालयाने दि.२५.७.२००८ रोजी दिला. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार श्री.साळुंखे यांना दीर्घ कालावधीसाठी देण्यात आलेली बी.एड.वेतनश्रेणी काढून घेणे योग्य नसल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा

यांनी नैसर्गिक न्यायानुसार निर्णय घ्यावा, असा आदेश उच्च न्यायालयाने दिला. त्यानुसार श्री.साळुंखे यांना बी.एड. वेतनश्रेणी देण्याचा आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी दि.६.१.२००९ च्या पत्रान्वये मुख्याध्यापकांना दिला. त्यानुसार कार्यवाही न झाल्यामुळे शिक्षणाधिकारी श्री.उदयसिंह भोसले यांनी सातत्याने पाठपुरावा केला. संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक यांच्याशी एकत्रित चर्चाही त्यांनी केली. दरम्यानच्या काळात संस्थेने उच्च न्यायालयात अपीलही दाखल केले आहे. परंतु उच्च न्यायालयाने शिक्षणाधिकाऱ्यांच्या निर्णयाला स्थगिती दिलेली नाही, तरीही शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाबाबतचा निर्णय संस्थेने घेतलेला नाही, तो न घेतल्यास मुख्याध्यापकांचे / शाळेचे वेतन थांबविण्याचा इशारा शिक्षणाधिकाऱ्यांनी दि.४.२.२.००९ च्या बैठकीनंतर दिला, असे शिक्षणाधिकारी श्री.उदयसिंह भोसले यांनी सादर केलेल्या अहवालात लेखी नमूद केले आहे.

श्री.साळुंखे यांना द्यावयाची वेतनश्रेणी आदी भाग प्रशासकीय कार्यवाहीचा आहे. परंतु त्या संदर्भातील माहितीची पूर्तता करणे ही संस्थेची जबाबदारी आहे. यातील काही माहिती शाळेकडे व बरीचशी माहिती प्रामुख्याने संस्थेकडे असल्यामुळे जन माहिती अधिकारी म्हणून केवळ मुख्याध्यापकांना त्यासाठी जबाबदार धरता येणार नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' सुनावणी, पत्रव्यवहार यातील पतिनिधित्व लक्षात धेता या सर्व कागदपत्रांचा कार्यभार श्री.एस.बी.कुंभार सांभाळतात, हे दिसून येते. त्यामुळे त्यांची जबाबदारी प्रमुख ठरते. संस्थेचा निर्णय झालेला नसल्यामुळे सेवापुस्तकासारखी बंधनकारक अशी माहिती ठेवलेली नाही व त्यामुळे ती उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवरील सेवाज्येष्ठता यादी सदोष ठरते. पर्यायाने मुलभूत माहितीच संस्थेच्या निर्णयाअभावी रोखून ठेवली जाते. तसेच उभय बाजूंचे दावे-प्रतिदावे असल्यामुळे काही माहिती दिली जात नाही. अपुरी माहिती संपूर्ण वस्तुस्थिती स्पष्ट करीत नाही. काही माहिती मुळातच दिली जात नाही, तसेच दिलेली माहिती चुकीची असल्याच्या अपीलकर्त्याच्या दाव्याची शहानिशाही त्यामुळे होऊ शकत नाही. सेवापुस्तकासारख्या महत्त्वाच्या नोंदी त्यामुळेच पूर्ण केलेल्या नाहीत, असे उभय बाजूंची सुनावणीतील निवेदने व कागदपत्रे पाहता स्पष्ट होते. नियमानुसार बंधनकारक

असलेली मूळ माहिती न ठेवणे, शिक्षणाधिकाऱ्यांच्या अथवा न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशील न देणे, हे रास्त माहिती मिळण्याच्या व पर्यायाने त्या आधारे आपला प्रश्न मांडण्याच्या अपीलकर्त्याच्या न्याय्य हक्काला मारक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अभिप्रेत असलेली पारदर्शकता व उत्तरदायित्त्व या तत्त्वांच्या विरुध्द अशी ही कृती आहे. माहितीचा मूळ स्त्रोतच खंडित करण्याच्या या कृतीबद्दल सार्वजनिक प्राधिकरण म्हणून संबंधित संस्थेवर कारवाई करणे आवश्यक ठरेल. मात्र त्याबरोबरच आवर्ती ठेव खात्यासारख्या व अन्य बाबीतील आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता अपीलकर्त्याने न करणे हेही माहितीच्या पूर्ततेत बाध आणणारेच ठरते, याची जाणीव आयोगाने संबंधितांना दिली.

या स्थितीत, नियमानुसार ठेवणे बंधनकारक असलेली माहिती परिपूर्णतेने सादर केली जाणे आवश्यक आहे. अपीलकर्त्याकडून त्यात त्रुटी राहिल्यास त्याला ते जबाबदार ठरतील. परंतु अन्य माहितीच्या पूर्ततेची जबाबदारी संस्थेवर, पर्यायाने श्री.एस.बी.कुंभर यांच्यावर राहील, असे निर्देश उभय बाजूंच्या प्रतिपादनानंतर आयोगाने दिले.

श्री.साळुंखे यांना बी.एड. वेतनश्रेणी द्यावी, वरिष्ठ वेतनश्रेणी द्यावी व त्या अनुषंगाने त्यांचे सेवापुस्तक पूर्ण करावे, असा निर्णय संस्थेने घेतला असून त्याची अंमलबजावणी करुन त्यानुसार परिपूर्ण माहिती आयोगाला सादर करण्यात येईल, अशी हमी मुख्याध्यापक श्री.एस.एम.शेलार व संस्थेचे प्रतिनिधी श्री.एस.बी.कुंभार यांनी दिली. श्री.कुंभार या सर्व बाबी हाताळत असल्यामुळे दि.१५.१०.२००९ पर्यंत त्यानुसार पूर्तता करणे ही व्यक्तिशः त्यांची जबाबदारी राहील व त्यानुसार पूर्तता न झाल्यास प्रत्येक अपिलात रु.२५००० शास्ती त्यांना लावण्यात येईल, अशी समज आयोगाने सुनावणीच्या वेळी दिली.

यानुसार दि.१५ ऑक्टोबर २००९ पर्यंत पूर्तता करण्याचे संस्थेने व शाळेने निश्चित केले आहे, त्यानुसार कार्यवाही केली जाईल, असे लेखी निवेदन श्री.शेलार व श्री.कुंभार यांनी आयोगाला सादर केले. यानुसार पूर्तता होत असल्यामुळे आपली तक्रार नसल्याचे लेखी निवेदन श्री.साळुंखे यांनी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले मान्य.

(२) अपीलकर्ता श्री.सुभाष एकनाथ साळुंखे यांना द्यावयाची सेवासलगतेसह बी.एड.वेतनश्रेणी, कालबध्द पदोन्नतीनुसार वरिष्ठ वेतनश्रेणी, सेवापुस्तक पूर्ण करणे या बाबींची पूर्तता करण्याच्या शिक्षण प्रसारक संस्था, सातारचे श्रीपतराव पाटील हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, करंजेपेठ, सातारा या संस्थेचे वरिष्ठ लिपीक श्री.एस.बी.कुंभार यांच्या निवेदनानुसार दि.१५.१०.२००९ पर्यंत कार्यवाही करुन परिपूर्ण माहितीचा अहवाल दि.२०.१०.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास श्री.एस.बी.कुंभार हे प्रत्येक अपिलात रु.२५००० शास्ती व अन्य प्रशासकीय कारवाई होण्यास पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १८ .९.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. वसंत महादेव लोहकरे
६, अजंठा सहकारी गृहरचना संस्था,
आनंदनगर, संतोष बेकरी लेन, सिंहगड रोड, पुणे -३७ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानरगपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** --<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण व विकास योजना,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.मदन रामचंद्र आढारी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,<br>बांधकाम नियंत्रण व विकास योजना,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.प्रविण वामन गेडाम | |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>मौजे खराडी, ता.हवेली येथील स.नं.१४ चा झोन दाखला मिळण्यासाठी | |

## विवेचन

श्री.वसंत महादेव लोहोकरे यांनी मौजे खराडी, ता.हवेली येथील स.नं.१४ चा झोन दाखल्याची मागणी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे माहिती. मागणी अर्जाद्वारे केली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

या अपिलांची सुनावणी दि.२८.०८.२००८ रोजी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी समक्ष हजर होते, मात्र अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्त्याने मूळ माहिती अर्जात 'झोन दाखला' मागणी केली असून महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार असे दाखले प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. अशा नकलांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करण्यापेक्षा अपीलकर्त्यानी त्यासाठीच्या प्रचलित नियमावलीनुसार अर्ज करुन व विहित केलेले शुल्क भरुन झोन दाखला प्राप्त करुन घेणे अधिक उचित ठरले असते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २२/०९/२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३८८/ सोलापूर | श्री. शंकर बजरंग काशीद ४६५, जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ सोलापूर | चेअरमन /सचिव एस. टी. एम्प्लाईज को -ऑप. क्रेडिट सोसायटी, व्दारा परिवहन विभागीय कार्यालय, सोलापूर | उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर | सर्वश्री राजेंद्र मागाडे, रहिम जमादार व श्री. जी. एस. कोरे यांच्या कर्जाची व जामीनदारांची माहिती, त्यांचा राजीनामा कोणत्या मिटिंगला मंजूर केला त्या प्रोसिडिंगची नक्कल, सन २००७ ते २००८ अखेर श्री. कुलकर्णी सी. ए. यांनी केलेल्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत. |
| २ | १३८९/ सोलापूर | श्री. शंकर बजरंग काशीद ४६५, जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ सोलापूर | चेअरमन / सचिव एस. टी. एम्प्लाईज को - ऑप. क्रेडिट सोसायटी, व्दारा परिवहन विभागीय कार्यालय, सोलापूर | उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर | सन २००३ ते २००७ या कालावधीतील वर्षनिहाय लेखा-परीक्षकांच्या दोष अहवालाची प्रत, दोष अहवालावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या माहितीची प्रत, तसेच ज्या कर्जदाराकडून कर्ज येणे बाकी आहे परंतु त्यांचेकडे कर्ज रोखे नाहीत अशा कर्जदारांची यादी. |

## विवेचन

नागरी सहकारी बँका व पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा न्यायनिर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकून २ अपिले (अपील क्र. १३८८/ सोलापूर व १३८९ / सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) नियंत्रण अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या सबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती अपिलकर्त्यांनी मागितल्यास त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार सबंधित कार्यालयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

पुणे
दि.२५.०९.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.चांदमल देवीचंद गांधी
१, पार्श्वनाथ हौसिंग सोसायटी,
सीटी सर्व्हे क्र.२६२६/२, नाशिक फाटा,
कासारवाडी, पुणे-३४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक,
नगर रचनाकार विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार,
नगर रचनाकार विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९०/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.०८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.चांदमल देवीचंद गांधी
१, पार्श्वनाथ हौसिंग सोसायटी,
सीटी सर्व्हे क्र.२६२६/२, नाशिक फाटा,
कासारवाडी, पुणे-३४

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक,
नगर रचनाकार विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार,
नगर रचनाकार विभाग,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०३.०७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.०९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** संयुक्त मोजणी नकाशा, नकाशा क्र./मोरंनं/न.भू.२५६/०५,दि.२२.११.२००६ हा दुरुस्तीचा प्रस्ताव करुन त्याप्रमाणे नगर भूमापन अधिकारी यांचेकडून दुरुस्त करुन घेऊन त्याची प्रत मिळणेबाबत. | |

## विवेचन

मौजे भोसरी सिटी सर्व्हे क्र.२६२६ व २६२६/१ या आपल्या मिळकतीमधून जाणाऱ्या पुणे -मुंबई रस्त्याच्या नकाशात क्षेत्राच्या नोंदी योग्य झाल्या नसल्याची अपीलकर्ता श्री.चांदमल देवीचंद गांधी यांची तक्रार असून त्या अनुषंगाने विविध पातळ्यांवर ते अर्ज व अपिले करीत आले आहेत. या संदर्भातील दोन (अपील क्र.५१९, ३०१०) अपिलांवरील आदेश आयोगाने पूर्वी दिले आहेत. या विषयाबाबतच प्रस्तुत अपील श्री.गांधी यांनी केले आहे.

आपल्याला चुकीचा नकाशा देण्यात आला असून मूळ प्रस्तावापेक्षा तो वेगळा आहे. त्यात आपली दीड - दोन गुंठे जागा वेगळी दाखविण्यात आली आहे. नकाशात दुरुस्ती करुन मिळावी, अशी मागणी आपण सातत्याने करीत असूनही त्यानुसार कार्यवाही होत नाही, असे प्रतिपादन श्री.गांधी यांनी केले.

श्री.रविंद्र चांदमल गांधी यांच्या नावाचा अर्ज आहे. संबंधीत नस्ती यापूर्वीही श्री.चांदमल देवीचंद गांधी यांना वेळोवेळी दाखविण्यात आली आहे, व त्यानुसार नकाशाची प्रत दिलेली आहे. त्यांच्या तक्रारीबाबत नगरभूमापन अधिकाऱ्यांनाही कळविण्यात आलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचनाकार विभाग,पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी केले. विशेष भूमी संपादन अधिकारी व महानगरपालिका यांच्याकडेही श्री.गांधी यांनी अर्ज केले होते. वाजवी दुरुस्तीसाठी पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेकडील मोजणी रजिस्टरमधील संबंधित 'इ' प्रत नगर भूमापन अधिकारी, पिंपरी - चिंचवड महानगरपालिका यांना पाठविण्यात आली आहे. ही सर्व बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याची माहिती श्री.गांधी यांना वेळोवेळी देण्यात आलेली आहे, असेही जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचनाकार विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री.शिंपी यांनी नमूद केले.

मिळकतीचे नवीन बांधकाम संयुक्त मोजणी नकाशात दर्शवून नगररचना विभागाने नकाशाची दुरुस्ती करावी, अशी श्री.गांधी यांची मागणी आहे. हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे. तरीही त्या संदर्भातील पुढील कार्यवाहीची माहिती श्री.गांधी यांना १५ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उपसंचालक, नगर रचना विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांना आयोगाच्या आदेशानुसार संयुक्त मोजणी नकाशाबाबत उचित कार्यवाही करुन १५ दिवसात निर्णय कळविण्याचे आदेश दि.२७.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले. भूसंपादन मोजणी रजिस्टर नं.२५६/०५ या विवरणपत्रात व मोजणी आलेखात दुरुस्ती करण्यात आलेली नाही, असे नगर भूमापन अधिकारी यांनी कळविल्याचे उपसंचालक, नगर रचना विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी श्री.रविंद्र चांदमल गांधी व श्री.चांदमल देविचंद गांधी यांना दि.०८.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविल्याचे सदर पत्राच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

श्री. गांधी यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही. तरीही वारंवार माहितीच्या अधिकारात अर्ज व अपिले करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही,याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २४/०९/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. तुकाराम विष्णू कवडे
रा. १७अे, सी-३ इमारत, सूर्यलोकनगरी,हडपसर,
वैदवाडी, हडपसर, पुणे-२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता (विकास योजना),
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २७.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. तुकाराम विष्णू कवडे
रा. १७अे, सी-३ इमारत, सूर्यलोकनगरी,हडपसर, वैदवाडी, हडपसर, पुणे-२८

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग,
शिवाजीनगर, पुणे-५ श्री. मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता (विकास योजना),
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अनिरूध्द घन:श्याम पावस्कर

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

सोबत प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

मौजे घोरपडीगाव, पुणे येथील स.नं.७१/२१अ प ७१/२१ब या आपल्या मालकीच्या जमिनीवरील विना परवाना बांधकामाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. तुकाराम विष्णू कवडे यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता (विकास योजना), बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली. अधिकाऱ्यांनी कायदेशीर कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडलेल्या नाहीत. अनधिकृत बांधकाम पाडणे आवश्यक असताना पाडलेले नाही, इ. विस्तृत कारणे नमूद करून अपीलकर्ता श्री. कवडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्या मूळ अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही व प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी आपल्याशी झालेल्या चर्चेनुसार तीन महिन्यांत माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला होता. परंतु त्यानुसार आपल्याला माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री. कवडे यांनी केले.

श्री. कवडे यांनी विस्तृत माहिती मागितली होती. माहिती संकलित करण्यात येत असल्याचे व तहसीलदार, जिल्हाधिकारी; पुणे आदी कार्यालयांमधून ती घ्यावी लागणार असल्यामुळे तीन महिन्यांचा कालावधी लागेल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. कवडे यांना विहित मुदतीत (दि. २०.९.२००७ रोजी ) कळविले होते. त्यातील निर्णयानुसार दि. ७.१२.२००७ रोजी माहिती देण्यात आली. अनधिकृत बांधकामे, गुंठेवारी कायद्यान्वये ती नियमान्वित करण्याची प्रक्रिया, नियमान्वित न होणाऱ्या बांधकामावरील कारवाई या प्रशासकीय कार्यवाहीच्या विषयासंबंधीही जन माहिती अधिकाऱ्यांनी या पत्रात माहिती दिली.

रस्ता नसताना विनापरवाना बांधकामे नियमित करण्याची आपली कारवाई कायदेशीर ठरते काय ? अशा स्वरूपाचे अनेक मुद्दे श्री. कवडे यांनी विचारले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ते 'माहिती' ठरत नाहीत. मात्र राहिलेल्या मुद्दयांची देय माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी तीन दिवसांत द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

आयोगाच्या आदेशानुसार श्री. कवडे यांना माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.३०.८.२००८ च्या अहवालान्वये संबंधित माहितीच्या प्रतीसह आयोगास अवगत केले. मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री. कवडे यांनी काही तक्त्यांसह दि. १.९.२००८ रोजी आयोगाकडे केली. आपले घर बेकायदेशीरपणे पाडले व इतरांची पाडली नाहीत, नियमाप्रमाणे नोटीस देणे आवश्यक असताना दिली नाही व विना परवाना बांधकाम पाडण्याची कारवाई केली पाहिजे, ती केली जात नाही, इ. मुद्दे श्री. कवडे यांनी या पत्रात मांडले आहेत.

श्री. कवडे याबाबत सातत्याने विविध पातळ्यांवर पत्रव्यवहार करीत आले असून दि. २२.२.२००६ ते दि. १३.८.२००८ या काळात तीसहून अधिक वेळा या बाबतचा सविस्तर पत्रव्यवहार केल्याचे त्यांनी कागदपत्रात नमूद केले आहे. विना परवाना बांधकाम करणाऱ्यांनी शासनाचा कित्येक लाख रूपयांचा महसूल बुडविला आहे, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने त्याबाबत कायद्यानुसार कारवाई करण्याचे जाणीवपूर्वक टाळले आहे, अशा स्वरूपाचे मुद्दे ती श्री. कवडे यांनी सविस्तर लेखी निवेदनाद्वारे मांडले आहेत. त्यांनी मांडलेला विषय गंभीर असला तरी उपस्थित केलेले प्रश्न माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेता येत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. तुकाराम विष्णू कवडे
रा. १७/अे, सी-३ इमारत, सुर्यलोकनगरी,
हडपसर, वेदवाडी, पुणे-१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता, उत्तरवादी
(विकास योजना ) बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २७.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. तुकाराम विष्णू कवडे
रा. १७/अे, सी-३ इमारत, सुर्यलोकनगरी,
हडपसर, वेदवाडी, पुणे-१३

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री. मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता, (विकास योजना )
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५
श्री. अनिरूध्द घन:श्याम पावस्कर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१०.२००७ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे घोरपडी गाव पुणे येथील २९२ बेकायदेशीर बांधकामांबाबत व त्यातील १३४ नियमितीकरणासाठी दाखल न झालेल्या बांधकामांबाबत आपण मागितलेली माहिती वारंवार अर्ज करून व स्मरणपत्रे पाठवूनही दिली जात नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. तुकाराम विष्णू कवडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. कवडे यांनी या विषयासंदर्भात विविध पातळ्यांवर वेळोवेळी अर्ज केले असून त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत आहे, तसेच प्रशासकीय कार्यवाहीची अपेक्षा असलेली आहे. उपलब्ध माहिती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली असून उर्वरित माहिती संकलित करून तीन महिन्यांत देण्यात येईल, असे कळविण्यात आले. तसा निर्णय प्रथम अपिलात दिला होता व त्यानुसार माहिती दिली जात आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही. अनधिकृत बांधकाम कारणाऱ्या संबंधितांवर, तसेच नियमाप्रमाणे रस्ता न सोडणाऱ्यांची प्रकरणे ना मंजूर करून माहिती द्यावयास हवी होती, ती दिली जात नाही. जमिनीचा बिगरशेती उपयोग करणाऱ्यांवर कारवाई करून जिल्हाधिकारी, पुणे यांचे दि. ८.१०.२००३ च्या पत्राप्रमाणे रू. ३० कोटी वसुली करणे आवश्यक असताना वसुलीबाबत कारवाई केल्याची माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री. कवडे यांनी तोंडी व विस्तृत लेखी निवेदनाद्वारे केले. या बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या असून कार्यवाही करून माहिती द्यावी, अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. तथापि त्यांच्या अर्जातील ४२ मुद्दयांचे स्पष्टीकरणात्मक उत्तर जन माहिती अधिकाऱ्यांनी तीन दिवसांत श्री. कवडे यांना द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. सुनावणीच्या आदल्या दिवशीच माहिती श्री. कवडे यांना पाठविण्यात आली असल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय गोविंद चौगले
रा. राम-लक्ष्मण निवास, मुख्य रस्ता, समर्थनगर,
नवी सांगवी, पुणे-४११ ०२७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दत्तात्रय गोविंद चौगले
रा. राम-लक्ष्मण निवास, मुख्य रस्ता, समर्थनगर,
नवी सांगवी, पुणे-४११ ०२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे
श्री. सुभाष डुंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे
श्री. रामदास तांबे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सरकारी बखळ जागेवरील अतिक्रमण व विकास योजनेतील रस्त्याबाबतची चूक दुरूस्ती करून मिळणे व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

रकारी बखळ जागेवरील अतिक्रमण व विकास योजनेतील रस्त्याबाबतची चूक दुरूस्ती करण्याची ाबाबतच्या कार्यवाहीची माहिती अपुरी व चुकीच्या देण्यात आल्याच्या कारणावरून अपीलकर्ता ात्रय गोविंद चौगले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड ालिका, पिंपरी, पुणे यांच्याकडे अपील केले. ऊर्वरित माहिती दहा दिवसांत श्री. चौगले यांना द्यावी, ादेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. परंतु 'संबंधित जागेतील रस्ता मंजूर विकास योजना यातील मोजमापानुसार न करता नगर रचना व विकास विभाग यांच्याकडून जाणून बुजून हेतूपुरस्सर बेजबाबदारपणाचे काम केले जाते व बांधकाम परवानगी दिली जाते, याबाबतची माहिती दिली जात शा कारणावरून श्री. चौगले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

वकास योजनेतील रस्त्याची जागा नकाशात वेगळ्या ठिकाणी व प्रत्यक्षात रस्ता वेगळ्या ठिकाणी ासनाच्या १९९५ च्या मंजूर विकास योजनेनुसार रस्ता धरलेला नाही, त्यामुळे आपल्या जागेत ण होत आहे, असे प्रतिपादन श्री.चौगले यांनी केले.

श्री. चौगले सातत्याने विविध पत्रव्यवहाराद्वारे हा विषय मांडत आले आहेत. जागेवर प्रत्यक्ष पाहणी या श्री. चौगले यांच्या मागणीनुसार पाहणी केली. प्रत्यक्ष जागेवरची स्थिती व भूमि अभिलेखाकडील ुळत नाही, त्या टिपण्णीसह सर्व माहिती देण्यात आली आहे. श्री. चौगले यांना विकास योजना हवा असून नगर रचना विभागाशी संबंधित असा हा विषय आहे. त्याबाबत त्यांनी स्वतंत्र अर्ज करणे ल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ुणे श्री. रामदास तांबे यांनी केले. विकास आराखडा तयार करताना हद्दी बदलण्याची शक्यता असते, लीय प्राधिकारी श्री. सुभाष डुंबरे यांनी नमूद केले.

श्री. चौगले यांची विकास योजना अभिप्रायाची व चूक दुरूस्त करून मिळण्याची मागणी हा विषय य कार्यवाहीचा आहे. मात्र विकास आराखड्यातील माहितीनुसार नकाशावरील रस्त्याबाबत सुसंगतता ाहिजे, या अनुषंगाने अपीलकर्त्याने या संदर्भात केलेल्या अर्जाच्या प्रती जन माहिती अधिकारी व प्राधिकारी यांना द्याव्यात, व जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित नोंदीमधील

नेमके पत्र श्री. चौगले यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना द्यावे, त्यानंतर एक आठवड्यात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांना उत्तर द्यावे, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

आयोगाच्या आदेशानुसार आपल्याला माहिती मिळालेली नाही व रस्त्याची संयुक्त मोजणी केलेली नाही, अशी तक्रार श्री. चौगले यांनी दि. ४.१२.२००८ रोजी आयोगाकडे केली. जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांच्याकडे याबाबत आयोगाने दि. १६.१२.२००८ रोजी खुलासा मागविला. भूमि अभिलेख आलेखावर मंजूर विकास योजना १९९५ च्या मोजमापानुसार रस्ता मार्क करून देण्याच्या आयोगाच्या आदेशानुसार श्री. चौगले यांनी त्याच दिवशी दिलेले आलेख शीटस् नगर रचना विभागाकडे दि. २८.८.२००८ रोजी पुढील कार्यवाहीकामी देण्यात आले. उप संचालक, नगर रचना विभाग यांनी दि. १०.९.२००८ रोजी रस्ता मार्क केलेला आलेख शीटस् या विभागाकडे सादर केला व नियमानुसार होणारे शुल्क रू. २१७५०/- अर्जदाराकडून घेण्यास कळविले. त्यानुसार हे शुल्क भरण्याबाबत श्री. चौगले यांना दि. १२.९.२००८ रोजी कळविले. त्यांनी हे शुल्क भरल्यानंतर त्यांना नकाशे देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता श्री. रामदास तांबे यांनी दि. २६.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. मात्र श्री. चौगले यांनी यालाही आक्षेप घेणारे पत्र दि. १६.९.२००८ रोजी आयोगाला सादर केले. श्री. चौगले यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. भूमापन कार्यालयातील आलेखावर सन १९९५ च्या मंजुर विकास योजनेत दर्शविलेल्या रस्ताचा प्रस्ताव भूमापन कार्यालयाकडील आलेखावर दर्शवून पाहिजे असल्यास त्यांनी स्वतंत्र अर्ज करावा, असे आदेश आयोगाने दिले आहेत, तसेच माहितीच्या मागणी बाबतचा नेमक्या तपशिलाचे निवेदन श्री. चौगले यांनी द्यावे, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला होता. परंतु श्री. चौगले यांनी दिलेला अर्ज मूळ अर्जापेक्षा वेगळी माहिती व स्पष्टीकरण मागणारा आहे, त्यामुळे नकाशा विषयक नियमानुसार होणारे शुल्क आकारून त्यांना नकाशा देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले होते, असे उप संचालक, नगर रचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी दि. १६.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

वरील बाबी लक्षा घेता श्री. चौगले यांच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीची दखल घेऊन संबंधित विभागाकडून नकाशे देऊ केले आहेत. त्याबाबतचे शुल्क श्री. चौगले यांनी भरणे आवश्यक आहे. तसेच या नकाशाबाबतचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता
प्लॉठ नं.३२०, फ्लॅठ नं.२, सेक्टर नं.२६,
महावीर कॉम्प्लेक्स, पीसीएनटी, निगडी, पुणे-४४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
भोसरी विभाग, पुणे-२६

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
प्राधिकरण, उपविभाग, पुणे-२६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५० /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २१.१०.२००८ |

**३. उपस्थित** -

**अपीलकर्ता** - श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता
प्लॉट नं.३२०, फ्लॅठ नं.२, सेक्टर नं.२६,
महावीर कॉम्प्लेक्स, पीसीएनटी, निगडी, पुणे-४४

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
भोसरी विभाग, पुणे-२६ तर्फे प्रतिनिधी श्री. डी. के. माने

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
प्राधिकरण, उपविभाग, पुणे-२६ श्री. मुकुंद कृष्णराव उजळंबकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.११.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून घरगुती वीजजोड देण्यासंबंधीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिशाभूल करणारी दिली. माहिती नि:शुल्क देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी दिल्यानंतरही संपूर्ण व योग्य माहिती मिळाली नाही, या कारणावरुन अपीलकर्ता श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

मूळ अर्ज केल्यापासून १५ महिने उलटून गेल्यानंतरही माहिती मिळालेली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी श्री. मेहता यांनी प्रपत्रात व अन्य निवेदनांद्वारे लेखी नोंदविली आहे.

श्री. मेहता वीज वितरणाच्या अनुषंगाने सातत्याने विविध अर्ज करीत असतात. वेळोवेळी त्यांना उत्तरे देण्यात येतात. विषयांकित अपिलात त्यांनी अर्ज केला तेव्हा तातडीच्या कामामुळे देखभालीची कामे अधिक असल्यामुळे काही माहिती विहित मुदतीत दिली होती. उर्वरित माहितीमध्ये श्री. मेहता यांनी कायदेविषयक अनेक तपशिलांची व काही मुद्दयांबाबत गृहीतावर

अधारित माहिती मागितली होती. ही सर्व माहिती दि.१८.१०.२००८ रोजी कागदपत्रांसह तपशीलवार तयार असून ती स्वीकारण्याबाबत त्यांना विनंती केली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता श्री. मुकुंद कृष्णराव उजळंबकर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी श्री. डी. के. माने यांनी नमूद केले असून माहिती देण्यास प्रथमच विलंब झाला असल्यामुळे तो क्षमापित करावा, अशी विनंती केली आहे. ती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. कृष्णाय रामचंद्र पवार
डॉ.आंबेडकर को.ऑप, हौसिंग सोसायटी,
ब्लॉक नं.६, कुमठा नाका,
सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७५/ सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम तारीख | दि.१६.०७.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. कृष्णाय रामचंद्र पवार
डॉ.आंबेडकर को.ऑप, हौसिंग सोसायटी,
ब्लॉक नं.६, कुमठा नाका,
सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.१२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.०१.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.०२.२००९ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मूळ अर्जातील माहितीची मागणी सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगाने दि.१६.०७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्याने या अपीलाची सुनावणी घेण्यात आली.

माहिती देण्यास विलंब झाला असतानाही काही माहिती आपण शुल्क भरुन घेतली. निविदांच्या छायाप्रती आपल्याला दिल्या असत्या तरी चालले असते परंतु तसे न करता काही माहिती नि:शुल्क मिळावी अशी मागणी श्री.कृष्णाय रामचंद्र पवार यांनी केली. श्री.पवार यांनी मागितलेली माहिती अनेक मुद्दयांची व अन्य विभागांकडून संकलित करुन द्यावयाची होती. तसेच त्यांची मागणी मोघम स्वरुपाची व विस्तृत असल्याने निश्चित कोणती माहिती हवी आहे हे कळवावे असे पत्र त्यांना त्वरीत पाठविण्यात आले होते. दरम्यान उपलब्ध झालेल्या माहितीसाठी रुपये ३,९६२/- शुल्क भरण्याबाबत त्यांना कळविण्यात आले. परंतु त्यावर त्यांनी प्रतिसाद दिला नाही व अपील केले. अपीलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांनी याच मुद्दयावर अपील फेटाळले असे प्रतिपादन कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर यांनी केले अभिलेखाचे अवलोकन करुन अपीलकर्त्याने पुन्हा अर्ज करुन माहिती घ्यावी असा निर्णय आपण दिला होता. परंतु, श्री.पवार यांनी संपर्क साधला नाही. या सर्वाच्या परिणामी पूर्ण माहिती दिली गेली नाही असे निवेदन अपीलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांनी दिले आहे.

अपीलकर्त्याने विस्तृत माहिती मागितली आहे. परंतु त्यातील काही मुद्दयांची माहिती विहित मुदतीत देणे शक्य होईल. तसेच काही मुद्दयांची माहिती निविदामध्ये समाविष्ट आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर श्री.दिपक शेंडगे यांनी ती देण्यात ६ दिवस विलंब केला आहे. या विलंबाबद्दल प्रतिदिन रुपये २५०/- प्रमाणे रुपये १,५००/- शास्ती होऊ शकते. शुल्कातील तेवढी रक्कम श्री.शेंडगे यांच्याकडून वसुल करण्यात येईल. ही रक्कम वजा जाता रुपये ३,९६२/- मधील उर्वरीत रक्कम अपीलकर्त्याने भरणे आवश्यक आहे. कोणत्याही पत्राला प्रतिसाद न देण्याची व शुल्क

न भरता प्रथम व द्वितीय अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. निषेध नोंदवून हक्क अबाधित ठेऊन माहिती घेणे व त्यानंतर आयोगाकडे त्याबाबत दाद मागणे हा मार्ग अपीलकर्त्याला उपलब्ध होता. परंतु त्यांनी तो अवलंबिला नाही.

विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर श्री.दिपक शेंडगे यांनी तीन दिवसात खुलासा सादर करावा त्यानंतर शास्तीबाबत निर्णय घेण्यात येईल असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

श्री.पवार यांनी सन १९९३-९७ या कालावधीतील विस्तृत माहितीची मागणी दि.१८.११.२००८ च्या (प्राप्त दि.२०.११.२००८) अर्जान्वये केली होती. त्यातील काही मुद्दयांची माहिती उपविभागाकडून घेणे आवश्यक होते. या संकलनास अवधी लागणार असल्याचे कागदपत्रांचे प्रमाणही जास्त असल्याकारणाने नेमकी कोणती माहिती हवी आहे ते कळविण्यास श्री.पवार यांना दि.२५.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. उप विभागाकडील माहिती दि.२३.१२.२००८ रोजी प्राप्त झाली, दि.२६.१२.२००८ च्या पत्रान्वये श्री.पवार यांना शुल्क माहिती भरुन जाण्यास कळविले तसेच दूरध्वनीवरुनही संपर्क साधूनही कळविले परंतु कोणत्याही बाबींना त्यांनी प्रतिसाद दिला नाही. माहिती नाकरण्याचा किंवा टाळण्याचा आपला उद्देश नव्हता, असा खुलासा श्री.दि.पं.शेंडगे यांनी दि.१८.०७.२००९ च्या पत्रान्वये सादर केला. शास्ती क्षमापित करण्याची विनंती त्यांनी केली असून यापुढे माहितीच्या अधिकारांवरील अर्जांवर विहित वेळेत व अधिक दक्षतेने कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद केले आहे. त्यांचा हा खुलासा मान्य करण्यात येत असून शास्ती अथवा माहितीसाठीचे शुल्क भरण्याच्या कारवाईतून क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दिनांक : ३० / ०९ /२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. महावीर रघुनाथ काकडे
काकडे वस्ती, पंढरपूर रोड, मोहोळ,
ता.मोहोळ, जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ,
जि. सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत मोहोळ, ता.मोहोळ,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७९/ सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम तारीख | दि.१६.०७.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. महावीर रघुनाथ काकडे<br>काकडे वस्ती, पंढरपूर रोड, मोहोळ,<br>ता.मोहोळ, जि.सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ,<br>जि. सोलापूर<br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत मोहोळ, ता.मोहोळ,<br>जि. सोलापूर | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.१२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.१२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२१.०१.२००९ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मूळ अर्जातील माहितीची मागणी सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगाने दि.१६.०७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्याने या अपीलाची सुनावणी घेण्यात आली.

मोहळ ग्रामपंचायतीकडील कामांची व भाडे तत्वावर दिलेल्या खुल्या जागांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर यांनी वेळेत दिली नाही. माहिती निःशुल्क द्यावी असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर यांनी दिल्यानंतरही माहिती मिळाली नाही. आपल्याकडे भाडेतत्त्वावर असलेली जागा ग्रामपंचायतीने ठराव करुन इतरांना विना भाड्यानें वापरण्यास दिली आहे. असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. महावीर रघुनाथ काकडे यांनी दिली.

ग्रामपंचायतीच्या मालकीची जागा श्री.काकडे यांना भूईभाड्याने दिली होती. नऊ महिन्यांचे भाडे थकले होते. श्री. काकडे यांनी ग्रामपंयायतीत न भरता आपल्या नावे रुपये ४,७००/- ची मनीऑर्डर केली . ती घेऊन जागेची दुभाड्याची पावती आपण करुन द्यावी अशी त्यांची मागणी होती. आपल्याला ते शक्य नसल्याने आपण मनीऑर्डर घेतली नाही. वैयक्तिक काम न केल्यामुळे आकसाने श्री.काकडे आपल्याविरुध्द तक्रार करीत आहे. असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर यांनी केले. श्री.काकडे यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याबाबत विहित मुदतीत रजिस्टर टपालाने त्यांना कळविले होते. त्यांनी ते घेण्यास नकार दिल्याने ते पत्र परत आले. माहिती निःशुल्क द्यावी असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर यांनी दिला. त्याच दिवशी टपालाने तो पाठविला असता सदरहू पार्टीचा घेण्यास नकार असा शेरा मारुन पाकिट परत आले, पत्र परत आल्याबाबतचा पंचनामा आपण केला. माहिती देण्यात आपण कसूर केलेली नाही. तसेच याबाबी वरिष्ठांनाही कळविले आहे. दरम्यानच्या काळात अपघात झाल्यामुळे इस्पितळात होतो. त्यामुळे पुढील कार्यवाहीस उशीर झाला. असे लेखी तोंडी प्रतिपादन जन

माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर श्री.नवले यांनी केले. पाठविलेल्या माहितीचे घेण्यास नकार दिल्याच्या शेऱ्यासह बंद पाकिट श्री.नवले यांनी सादर केले.

माहिती मागून ती न स्विकारण्याची अपिलकर्त्याची कृती योग्य नाही. अपीलकर्त्याने ती त्वरीत स्विकारणे आवश्यक होते. माहिती योग्य नसल्यास त्यानंतर तक्रार व अपील करण्याचा मार्ग त्यांना होता.

आयोगाचे कक्ष अधिकारी श्री.राजेंद्र गेंगजे यांच्यासमोर श्री.नवले यांनी श्री काकडे यांना हे पाकिट दिले. १७८ पाठपोट प्रती त्यात असल्याचे दोघांनीही स्वाक्षरीसह लेखी दिले. माहिती योग्य आहे की नाही हे आपण आज ठरवू शकत नाही. त्याबाबत आपण नंतर आयोगाला कळवू असे श्री.काकडे यांनी स्वतंत्र निवेदन आयोगाला सादर केले. मात्र नंतर त्यांनी काहीही कळविलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २३/०९/२००९

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ